# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.03.2025** **वार- बुधवार**

---

**निधी**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने अंतर्गत शेतकऱ्यांच्या मोबाईल वर पी.एम.किसान यादी किंवा पी.एम.किसान ॲप या संदेशाची लिंक अघडताच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात असलेली रक्कम नाहीशी होत असल्याचे प्रसंग पाहता शेतकऱ्यांनी फसव्या पीएम  किसान ॲप्लीकेशनपासून सावध राहावं असं आवाहन पुणे  जिल्हा अधिक्षक कृषी विभागानं केलं आहे. शेतकऱ्यांनी मोबाईलवर पी.एम.किसान लिस्ट, किंवा पी. एम. किसान ॲप या संदेशाची लिंक उघडू नये किंवा तिचा वापर शेतकऱ्यांनी करू नये, तसंच अशी काही घटना घडल्यास किंवा आढळून आल्यास त्वरित सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदवावी असं आवाहन पुणे कृषी विभागानं केलं आहे.

**पोलिस**

गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी पुणे पोलिस दलात लवकरच अत्याधुनिक तंत्रज्ञानानं सुसज्ज, गस्ती वाहन दाखल होणार आहे. या वाहनातून अत्याधुनिक कॅमेऱ्यांद्वारे संवेदनशील भागातील गुन्ह्यांवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. यामध्ये पाच ड्रोनचा वापर करण्याचं प्रशिक्षण, पोलिस कर्मचाऱ्यांना देण्यात येणार आहे. या वाहनांच्या माध्यमातून केलं जाणारं चित्रीकरण शिवाजीनगर मुख्यालयात पाहता येणार आहे. प्रत्येक वाहनाची किंमत अंदाजे दीड कोटी रुपये आहे.

**जत्रा**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत पुणे जिल्हयातील महिला बचतगटांची सावित्री जत्रा उद्यापासून दहा तारखेपर्यंत सिंचननगर इथल्या मैदानावर भरविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली.  पुणे जिल्हा परिषदेमार्फत १३ तालुक्यांतील महिला स्वयंसहायता गट या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि जिल्हा परिषदेच्या वतीनं या जत्रेमध्ये शाश्वत शेतीवर आधारित आधुनिक शेती प्रात्यक्षिक आणि प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू विकत घेवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी पुणेकरांनी जत्रेला भेट द्यावी असं आवाहन पाटील यांनी केलं आहे.

**वाहतूक**

पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांवर वाहतूक कोंडी होऊ नये, पादचारी मार्गांवरून नागरिकांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत असतात. या अनुषंगानं अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी विविध रस्ता दुभाजक आणि पादचारी मार्गांच्या कामाची पाहणी केली आणि अधिकाऱ्यांना विविध सूचना दिल्या.

**शस्त्रक्रिया**

पुण्यातील  ससून रुग्णालयात एका 44 वर्षीय  महिलेची  आतड्याच्या कर्करोगाची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. शस्त्रक्रिया केलेलं आतडं पुन्हा इतर आतड्यांना जोडण्यात आलं. ही शस्त्रक्रिया ससून रुग्णालयाचे शल्यविशारद डॉक्टर  किरणकुमार जाधव आणि त्यांच्या पथकानं केली अशी माहिती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर  एकनाथ पवार यांनी दिली.

**जीबीएस**

जीबीएस रुग्णांवर होणारा खर्च विचारात घेता राज्य सरकारनं महात्मा फुले आरोग्य योजनेच्या अनुदानात वाढ करावी, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज विधानसभेत केली.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी शिरोळे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. जीबीएस आजारावरील औषधे कुठे-कुठे उपलब्ध आहेत? तसंच कमी दरात ती कशी देता येतील? याचाही विचार झाला पाहिजे, असंही आमदार शिरोळे यांनी सांगितलं.

**टँकर**

पुणे महापालिकेच्या टँकर पॉइंटवर भरलेल्या टँकरचा चालक नागरिकांकडून जास्त पैसे घेत असेल, तर नागरिकांनी तक्रार करावी. त्यावर कारवाई केली जाईल. तसंच टँकर वाहतुकीचे दरही विभागानुसार येत्या दहा दिवसांत जाहीर केले जातील असं पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितलं. पुण्यात प्रत्येक भागात पाण्याच्या टँकरसाठी वेगवेगळे दर आकारले जात आहेत. याबाबत पाणी पुरवठा विभागानं नागरिकांना तक्रार करण्याची सूचना केली आहे.

**बुद्धिबळ**

पुणे जिल्ह्यात मंचर इथं झालेल्या अखिल भारतीय खुल्या गटाच्या फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत सहा गुणांसह वैभव बाकलीवाल विजेते ठरले. या स्पर्धेत 4 ग्रँडमास्टर, 1 महिला ग्रँडमास्टर, 136 मानांकित खेळाडू यांच्यासह 236 खेळाडूंचा समावेश होता.

**स्पर्धा**

35 वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा नुकतीच ठाण्यात पार पडली. या स्पर्धेत पुणे शहर आणि पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील 244 खेळाडूंनी भाग घेतला होता.

**सत्कार**

कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या वतीनं जागतिक महिला दिनानिमित्त कऱ्हाडे ज्ञातीतील विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा 'कऱ्हाडे भूषण राणी लक्ष्मीबाई' पुरस्कारानं सन्मान केला जाणार आहे. पुरस्काराचे वितरण खासदार प्राध्यापक डॉक्टर मेधा कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात होणार आहे.

पुणे आणि परिसरात दिवसा कमाल तापमान आज 37 अंश सेल्सियसपर्यंत नोंदवलं गेलं. उद्याही असंच हवामान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**